॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.४ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रवेश पुर्व परीक्षेच्या (पेट) तिसऱ्या दिवशी ५५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात दि. २ जानेवारी पासून पेट परीक्षा सुरु झाली आहे. दि. ४ जानेवारी रोजी मानव विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील काही विषयांच्या चार सत्रात परीक्षा झाल्या. ७६४ विद्यार्थ्यांपैकी ५५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली २०९ विद्यार्थी अनुपस्थित होते. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी परीक्षा केंद्राला भेट दिली. मुख्य समन्वयक म्हणून प्रा. मनोज पाटील, समन्वयक म्हणून प्रा. सुरेंद्र कापसे, केंद्र प्रमुख म्हणून प्रा. के.एफ. पवार तसेच तांत्रिक अधिकारी म्हणून दाऊदी हुसेन काम पाहत आहेत. संशोधन विभागातील अधिकारी व कर्मचारी हे परीक्षा सुरळीत होण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.४ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा. अजय पाटील होते. सावित्रीबाई फुले यांचे स्त्री -पुरुष समतेचे मूल्य समाजात रूजविणे गरजेचे असल्याचे मत प्रा. पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. उमेश गोगडीया हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय घोरपडे यांनी केले. प्रा. तथागत सुरवाडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. अभय मानसरे, डॉ. कविता पाटील, डॉ. दिगंबर सावंत आदीसह प्रशाळेतील प्राध्यापक विद्यार्थी, उपस्थित होते.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ४ जानेवारी, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी